महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : डीआरए-०५२२/प्र.क्र.०६/२०२२/जाहिरात दिनांक : १२ डिसेंबर, २०२२

## -: शुध्दीपत्रक :-

**विषय : सहायक आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासकीय सेवा, गट-अ.**
**- शैक्षणिक अर्हतेतील बदल व अर्ज सादर करण्याच्या दिनांकास मुदतवाढ देणेबाबत.**
**संदर्भ : जाहिरात क्रमांक-०२०/२०२२**

शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या मागणीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासकीय सेवा, गट-ब या संवर्गातील एकूण १५ पदांच्या भरतीकरीता दिनांक १९ मार्च, २०२२ रोजी (जाहिरात क्रमांक ०२०/२०२२) प्रसिध्द करण्यात आली होती.

२. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हतेच्या संदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ६७७/२०२२ मधील संकीर्ण अर्ज क्रमांक ६२९/२०२२ प्रकरणी मा. न्यायाधिकरणाकडून दिनांक ९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार प्रस्तुत संवर्गाच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे :-

**"Possess a degree in Pharmacy or Pharmaceutical Chemistry or Degree in Medicine with specialisation in Clinical Pharmacology or Microbiology from a recognised university established in India by law."**

३. प्रस्तुत शैक्षणिक अर्हतेमधील बदलामुळे संबंधित पात्र उमेदवारांना अर्ज सादर करण्यास खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करावयाचा कालावधी | दिनांक १४ डिसेंबर, २०२२ रोजी १४.०० वाजल्यापासून दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी २३.५९ पर्यंत. |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक | दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी २३.५९ |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | दिनांक २५ डिसेंबर, २०२२ रोजी २३.५९ |
| ४ | चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

४. शैक्षणिक अर्हता व अनुभव आणि जाहिरातीस अनुसरुन सादर करावयाच्या आवश्यक प्रमाणपत्रांची वैधता तपासण्याकरीता अंतिम दिनांक २३ डिसेंबर, २०२२ असा राहील. तसेच इतर सर्व अटी व तरतुदी प्रसिध्द करण्यात आलेल्या तपशीलवार मूळ जाहिरात क्रमांक ०२०/२०२२ मध्ये नमूद केल्यानुसार राहतील.

५. सदर शुध्दीपत्रक व मूळ जाहिरात क्रमांक ०२०/२०२२ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण : मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.